दै. गोदातीर समाचार दि. १५/०१/२०23.

# नांदेड पोलीस दलातील अंमलदार विनोद भंडारे यांनी मिळवले सुवर्ण पदक



**नांदेड**– येथे नुकत्याच पार पडलेल्या पहिल्या नॅशनल इंडियाका कप २०२२- २०२३ स्पर्धेमध्ये नांदेड पोलीस दलातील अंमलदार विनोद भंडारे यांनी सुवर्ण पदक पटकावले आहे. या गेमचे इंटरनॅशनल स्पर्धा जर्मनी येथे होणार आहे.

सदरची स्पर्धा ही दिनांक सहा ते आठ जानेवारी दरम्यान गुरूगोविंदसिंघजी स्टेडियम क्रीडा संकुल इंडोर हॉल येथे पार पडली. सदर स्पर्धेत उत्तरप्रदेश, केरळ, छतीसगड, महाराष्ट्र, जम्मु काश्मीर इत्यादी राज्यातील एकुण २५० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

सदर यशाबदल पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक आबिनाश कुमार, खंडेराव धरणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी भंडारेंचे अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेछा दिल्या आहेत.